Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)
VOL- VIII | ISSUE- III | MARCH | 2021 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.149 | ISSN 2349-638x

# मराठी आंबेडकरवादी कविता

प्रा.डॉ. गोविंद नामदेव रावळेकर
मराठी विभाग प्रमुख
यशोदा गर्ल्स आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज,
स्नेहनगर,
वर्धा रोड, नागपूर–15

प्रस्ताविक –

आजच्या एकविसाव्या शतकात 'कोरोना' सारख्या महामारीने ग्रासलेल्या आणि गतजन्मात अस्पृश्य समाज 'जातीभेद आणि विटाळ' या महामारीने हतबल झाल्याने या दोन्ही परिस्थितीची जाणीव करून बधितले असता कोरोना काळात रक्ताची माणसंच दूर झालेली दिसतात. तिथे परकीय माणसाच दायित्व काय? हया हिंदूधर्म परंपरेत चातुर्य वर्णातील मान देवून अस्पृश्यांना हजारो वर्षे इतर वर्णापासून दूर ठेवून अज्ञानी ठेवल्या गेले त्या हजार वर्षाच्या गुलाम आणि अज्ञानी अस्पृश्यांना पूर्व पदावर आणण्यासाठी हजारो लाखो अबजोतून एक महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 1935 च्या नाशिक येथील येवला या ठिकाणी म्हटले 'मी हिंदू धर्मात जन्मलो, तरी मी हिंदू धर्मात मरणार नाही' ही ऐतिहासिक वाणी खऱ्या अर्थाने 14 ऑक्टोबर 1956 ला नागपूरच्या दीक्षाभूमी येथे सहा लाख अनुयायासह बौद्ध धम्माची दीक्षा स्वीकारली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीने आणि विचाराने प्रेरित होऊन शिक्षित तरूण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा' या मूलमंत्राने जागृत होऊन वेदना, नकार आणि विद्रोह या बाबीतून हा शिक्षित तरूण मराठी आंबेडकरवादी कवितेला जवळ केला. बहुतांशी मराठी आंबेडकरवादी कविता ही लढयातून निर्माण झालेली आहे. तेच लढयाचे साधन आहे. विध्वंस आणि नवनिर्मिती ही दोन्ही कार्य करू शकणारे प्रभावी आणि प्रखर शस्त्र आहे. बहुतांश मराठी आंबेडकरवादी कविता ही समूहाच्या स्वरात प्रकट होत असतांना दिसते. या मराठी आंबेडकरवादी कविता या अनुषंगाने मीना गजभिये, सुरेखा भगत, संध्या रंगारी, प्रज्ञा बडोले यांच्या कवितेचे संशोधन करणे महत्वाचे ठरते.

## मराठी आंबेडकरवादी कवयित्रीची कविता :

समकालीन आंबेडकरवादी स्त्री कवयित्रीच्या कवितेत विद्रोह हे केंद्रवर्ती वैशिष्टय आहे. इथल्या वर्णभेदाविषयी लढा उभारून मराठी आंबेडकरवादी कवयित्रीने आपल्या कवितेतून समाज परिवर्तन आणि समताधिष्ठित नवा समाज निर्माण करण्याची गरज आहे. अशा आशावाद मराठी आंबेडकरवादी कवयित्रीने जोपासला आहे. दया, सहानुभूमी, माणुसकी ही साऱ्या धर्माची मूलतत्वे आहेत. पण हे मान्य करणारी माणसे इथे नाहीत.या माणसांच्या विझलेल्या प्रदेशात निखारे होऊन जगावे, असे मराठी आंबेडकरवादी कवयित्रीला सामाजिक भानेतून ताकत निर्माण करण्याचे बळ आहे. कवयित्री मीना गजभिये 'भूक' या कवितेत म्हणतात.

*''...... कावळयाच्या एक उपयोग पाहिला झाले मी थक्क*

*उपाशी लोकांना कावळे खातांना पाहिले मी चक्क'*
*ढोरे खा, गुरं खा, कावळे खा कुणी केलाय रिवाज*
*उठत का नाही याविरुद्ध अजूनही कुणाचा आवाज*
*ज्यांनी केलंय माझ्या बांधवांना*
*कावळे खाण्यास मजबूर*
*त्यांनीच दिलंय स्वतःऐवजी कावळयांना सुळावर*
*पाहून जगणे त्याचे असे अर्थहीन*
*..... पण मी ज्यांच्यासाठी लिहिते*
*त्यांच्यापर्यंत आक्रोश माझा गेला नाही.*
*माणसांनी माणसारखंच रहावं*
*हे त्यांनाअजून कळलेले नाही*
*पोटातही भूक त्यांना तसं कळू देणारही''*
*('भूक')*

या कवितेत कवयित्रींची खंत अशी आहे की, हजारो वर्षे ज्या वर्ण व्यवस्थेने आम्हास व आमच्या बांधवांना मनोविकृती, अज्ञान, अंधश्रद्धा या अंधारातून बाहेर पडण्याचे मार्गच बंद केल्याने जो माणूस माणसाच्या सानिध्यात राहू इच्छित असतांना सुद्धा ते विचार मनातल्या मनातच घुटमळत राहत होते. इथली ही अघोरी परंपरा साध्यासुदया माणसांनाही जनावरापेक्षाही बत्तर जीवन जगण्याकडे घेवून जात होती. या परिस्थितीचा सुगावा कवयित्रीला लागल्याने तिला वाटते की माझे माणसासारखे माणसं हजारो वर्षे या वर्णव्यवस्थेने गुलाम आणि अज्ञानी करून सोडले असतांना ती आपल्या बांधवांना जागृत करण्यासाठी अतोनात लेखन प्रक्रियेने विद्रोही होण्यासाठी जागृत करण्याचा विळा उचलते पण त्याचे बंधन हे हजारो वर्षे भूकेने वेडे झालेले असल्याने त्यांना माणसं काय? आणि जनावर काय? यातला कुठलाच फरक दिसत नाही. त्यांना किडया माकोडयासारखे जगणे आणि मिळेल त्या अन्नावर आपली भूक भागविणे अशा या भयावह दुःखाचे, भूकेचे, वेदनेचे, मानसिक गुलामीचे चित्र, कवयित्रीने या वर्णव्यवस्थेलाच दोषी ठरवून 'माणसांना माणसासारखं रहावं' हे सुद्धा ही वर्णव्यवस्था होऊ देत नाही याची तीव्र संवेदनशील खंत कवयित्री प्रगट करतांना दिसतात.

कवयित्री पुढे आपल्या 'माणसं' या कवितेतून म्हणतात,

*''उकिरडयावरची माणसं*
*फेकलेल्या पत्रावळीसाठी*
*आपआपसात भांडू लागली*
*तेव्हा हाडूक चघळणाऱ्या*
*दोन कुत्र्यांनीच*
*मान खाली घातली*
*इथल्या उंच हवेल्यांनी*
*किती तरी जीव चिणून मारलेत पायाखाली*
*भिती आड राहणाऱ्यांनो!*
*लक्षात ठेवा,*
*भिंतीच येतील जवळ जवळ*
*आणि घेतील तुम्हाला कवेत*

कवयित्रीने हया हिंदु अस्पृश्य समाजातील आपल्या बांधवांना स्पृश्य लोकांनी दिलेली वागणूक अतिशय हिन आहे ती जनावरापेक्षा बत्तर आहे म्हणून ते स्पृश्य लोकांना म्हणतात आमच्या बांधवांना पायाखाली तुडवलात लक्षात ठेवा ज्या चातुवर्ण व्यवस्थेतील फक्त असलेला अस्पृश्य हा जेव्हा बाहेर निघून क्रांती करेल तर तुम्ही निर्माण केलेल्या उंच–उंच भिंतीच तुम्हाला एखाद ढिणगी तुम्हाला संपविल्या शिवाय राहणार नाही. अशी क्रांतीची भाषा कवयित्री या कवितेतून करतांना दिसतात. यावर बाबुराव बागुल म्हणतात ''दलित म्हणजे वर्ण व्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उद्ध्वस्त करू बघणारा दलित म्हणजे हे जग व जीवन नव्याने मांडू बघणारा दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावत, प्रलयकारी केलेले आहेत आणि ज्याच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि

शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत या आपल्या दलितांच्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, आफ्रो–आशियाई देशातील काळा, गोरा, पिवळा येतात. आपल्या देशातील अस्पृश्य, आदिवासी, शोषित, पीडित येतात.''[1] यावरून असे लक्षात येते की, आंबेडकरवाद ही फक्त आपल्या देशापुरता मर्यादित नाही तर संपूर्ण जगात जिथे–जिथे काळा, गोरा असा भेदाभेद असो किंवा अस्पृश्य, आदिवासी, शोषीत, पिडीत असो तिथे आंबेडकरवादाशिवाय पर्याय नाही.

मराठी आंबेडकरवादी कवयित्री सुरेखा भगत आपल्या 'देणे' या कवितेत म्हणतात,

*''.....तू कसा अन् किती वेळा वेडा होणार?*
*अध्यात्म्याच्या गुंगीने कि फाटक्या परस्थितीने?*
*किती रस्ता चाललो पिढयान पिढया*
*मैलाचा दगड मिळालाच नाही*
*मिळाला नाही स्वच्छ आरसा*
*ज्यात दिसेल समाजमनाची स्पष्ट प्रतिमा*
*दोस्तहो, आपणच आपल्या बुद्धीचे मालक,*
*हक्कदार!*
*तेव्हा विचार करा*
*भव्य दिव्य दिखाऊ वास्तूंनी भारावून जाऊ नका*
*गहिवरुन या दुःखी पिडीतांच्या वेदनेने*
*त्यांना सावरण्यासाठी अस्वस्थ होऊ द्या तुमची मने*
*जिथून उगम असेल बुद्धाच्या करूणेचा*
*अन् पुढे घडू पाहणाऱ्या सम्यक क्रांतीचा*
*तेव्हा थोडे भारावून जा*
*माणुसकीच्या नात्यासाठी माणसाचे देणे व्हा!''*
*('देणे')*

कवयित्री आपल्या बांधवांना सावरण्याकरिता प्रवृत्त करतांना दिसतात. अध्यात्मिक गुंगीत किंवा आपल्या कमीपणात कुठेही गुंतून न राहता जी नवी द्वारे आपणास महामानवाने बुद्धाच्या तत्वज्ञानाने समाजमनाची स्पष्ट प्रतिमा दिसायला लागली. आपणच आपल्या बुद्धीने हक्कदार होऊन भव्य दिव्य वस्तुंना नाकारून आपल्याला दुःखी पिडीताविषयीची कनव निर्माण होऊन त्यांना आत्मसात करावे. त्यांना सावरण्यासाठी विपरित परिस्थितीचा सामना करून बुद्धाच्या करूणेच्या विचाराला आपलस करणे फारच गरजेचे आहे. त्यातूनच सुवर्ण मध्य ज्ञानाने विषम समाजरचना स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या चतुर्थ सुत्राने आपण आपल्याच माणसांना माणुसकीचे धडे गिरवत जाऊन माणसाने माणसाच्या माणुसकीसाठीच जगत राहावे हे देणे सम्यक ज्ञानाचे प्रतिक आहे, असे या कवितेतून लक्षात येते.

पुढे कवयित्री सुरेखा भगत आपल्या 'आवाहन' या कवितेत म्हणतात –

*त्यांचे सारे सोहळे मोडीत काढावे*
*असे केवळ वाटून उपयोगाचे नाही*
*एकमेकाच्या समाधानासाठी*
*आतल्या आत हमसून रडून उपयोगाचे नाही*
*.....रक्त लांछीत सकाळ तुम्हाला दिसत कशी नाही*
*उषेचा रक्तीमा पाहत बसू नका*
*काळोखाचे मित्र व्हा*
*सारीकडून हाका ऐकू येत आहेत*
*अशावेळी निश्चिंतपणे पहुडून राहू नका*
*भोवती वेढा पडण्याच्या आत*
*त्याचा दोर कापण्यासाठी सज्ज रहा!'' ('आवाहन')*

कवयित्रीने या कवितेतून जे अस्पृश्य बांधवांना आव्हान केले आहे ते हातावर हात ठेवून उभे रहायचे नाही. आपल्यावर आलेल्या विपरित परिस्थितीवर मात करून त्या परिस्थितीचे बिमोड करण्यासाठी तत्पर रहा. एखादे कोणतेही कार्य हाती घेतले की, ते कार्य पूर्ण होत नाही तोपर्यंत एकमेकांची साथ सोडू नका आपल्यावर आलेल्या प्रत्येक आव्हानाला समोर जाण्यासाठी त्या आव्हानाची सुरूवात होण्याआधीच त्या आव्हानाला पेलण्याची ताकत स्वतःमध्ये निर्माण करा आणि नेहमी तत्पर राहा. हजारो वर्षे परंपरेतली संस्कृतीची कोंड फोडण्यास तत्पर राहाच. अशी कवयित्री आपल्या कवितेतून आव्हान करतांना दिसते. यावर गंगाधन पानतावणे म्हणतात ''इतिहासातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक व नैतिक

अनुबंध तपासणे आणि त्याच्या सम्यक अर्थ आविष्कृत करणे ही बाब विद्रोहीलक्ष्यी जाणिवेचीच द्योतक होय.''[2] यावरून असे लक्षात येते की, पूर्व इतिहासातील रुढी, परंपरा, संस्कृती याची शहानिशा करणे आणि जिथे जिथे माणुसकीला काळीमा फासल्या जाते तिथे चुका दर्शवून माणसांना माणुसकीची वागणूक देण्यासाठी बंड करून उठणे हेच विद्रोहाचे खरे कारण आहे.

मराठी आंबेडकरवादी कवयित्री संध्या रंगारी 'आसवं' या कवितेत म्हणतात–

*''ज्या खारट पाण्यानं*
*समुद्र बनला*
*ते खारट पाणी*
*आमच्याच डोळयातलं होतं*
*पण आता*
*समुद्रातच आग लागलीय*
*तीच खारट आसवं*
*आता भडकलीत*
*अगदी मातीच्या तेलासारखी'' ('आसवं')*

कवयित्रीने अस्पृश्यावर अगणित दुःख वर्णव्यवस्थेने दिल्याने अथांग सागर दुःखाने वेढलेला होता. पण आता हे अथांग सागरच आपल्यावर होणाऱ्या अन्याय, अत्याचार, शोषण, भेदाभेद, विषमता हया सर्वांना कंटाळून तो आता जागृत होऊन या पासुन मुक्त होण्यासाठी माणसाला माणुसकीची वागणूक मिळविण्यासाठी तो क्रांतीच्या भाषेने सर्व आपल्या आप्त बांधवांना जागृत करून अस्पृश्य या पिढेतून बाहेर काढण्याचे काम केल्याशिवाय आपली आसव थांबणार नाही. असे कवयित्रीने या कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

ते पुढच्या कवितेत 'कुंपण' मध्ये म्हणतात–

*''संस्कृतीच्या काटेरी कुंपणात*
*माझ्या आयुष्याचे फूल*
*उमलण्यापूर्वीचे कुस्करले होते*
*गरूडासारखी झेप माझी*
*पण*
*परंपरागत रुढींनी*
*पंखच छाटले होते*
*दाद मागावी तरी कोणत्या न्यायालयात?*
*कारण*
*इथे तर*
*निरपराध्यांनाच अपराधी म्हणून*
*सुळावर लटकवले जात आहे.'' ('कुंपण')*

कवयित्रीने संस्कृतीला काटेरी म्हणून तीच खऱ्या अर्थाने आमच्या प्रगतीची घात पायरी आहे. स्वतः कवयित्री गरूड झेप घेणारी पण इथला परंपरा, रुढींना पखंच छाटले आहे त्यामुळे इथली न्यायालये त्यांचीच आहे. त्यामुळे न्याय मिळणार कुठे? इथे फक्त निरपराध्य अस्पृश्याला गुन्हेगारीच्या पिंजऱ्यात अडकवून नेहमी त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करीत राहतात. सुळावर लटकविले जातात. ही विषमतेविषयीची चीड कवयित्री इथे स्पष्ट करतांना दिसते. पुढे कवयित्री आपल्या 'जातं' या कवितेत म्हणतात –

*''मी मायला इचारलं*
*माय,*
*तू देवळात कधीच जात न्हाईस*
*तव्हा माय मनली*
*पोरी,*
*त्या दगडाच्या देवाम्होरं*
*सारं आयुष्य वाहीलं*
*तरीबी त्याले पाझर फुटत न्हाई*
*त्यापरीस माझं जातं बरं*
*ते कधीच चार दाण्याशी बेईमान होत न्हाई''*
*('जातं')*

कवयित्री या कवितेतून सामाजिक, वास्तविक चित्र आपल्या डोळयासमोर मांडले आहे. ज्या रुढी, परंपरेने आपणास काल्पनिक ईश्वरात गुंतवून ठेवले त्यात गुंतून न राहता आपल्यावर आलेल्या प्रत्येक संघर्षाला समोर जायच असेल तर इहनिष्ठ गोष्टीसाठीच आपल्याला जुळून राहून

स्वतःच्या मेहनतीनेच बुद्धीने आपले जीवन सावरावे. कुठल्याही मिथ्या गोष्टींना चिटकून राहू नये. असे कवयित्रीने सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी आंबेडकरवादी कवयित्री प्रज्ञा बडोले 'महा बाप सांगे मले' या कवितेतून ते म्हणतात—

*''महा बाप सांगे मले*
*पळसाले पानं तीन*
*नको राहूस अडाणी*
*कर जीवनाचं सोनं*
*.... किती शिकलावं बाप*
*नाही गेला कधी शाळा*
*त्याच्या चतुर बुद्धीचा*
*नाही अंतच लागला*
*....महा बाप माझा मार्ग*
*महा बाप माझी दिशा*
*सदा पासच होण्याने*
*उंचावल्या त्याच्या आशा*
*माहया शिक्षणाच्या पायी*
*बाप शिणला झिजला*
*त्याने सोताच्या सुखाला*
*उभा सुरूंग लावला.'' ('महा बाप सांगे मले')*

कवयित्रीने या रुढी परंपरागत सामाजिक जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'शिका, संघर्ष करा आणि संघटित व्हा' या मुलमंत्राने सारा अनाडी अस्पृश्य समाज जागृत होऊन त्यांनी मुला—मुलींमध्ये कुठलाही फरक न करता आपल्या मुलांना शिकवणे फारच गरजेचे आहे. या मुलमंत्राने अडानी बापाने आपल्या मुलीला आपल्यापेक्षा अधिकच शिक्षण घेऊन मोठ व्हावे यासाठी स्वतःची जमा पुंजी पूर्णपणे आपल्या मुलीच्या शिक्षणाकरिता लावून तिला आपल्या पायावर उभ राहता येईल हीच अपेक्षा ठेवून त्यांनी स्वतःचे जीवन तिच्या शिक्षणासाठी सर्मपीत केले. हीच बाब या कवितेतून कवयित्रीनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे. यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात ''हिंदू समाजाच्या अगदी खालच्या थरातून आल्यामुळे शिक्षणाला किती महत्व आहे ते मी जाणतो. खालच्या समाजाची उन्नती करण्याचा प्रश्न आर्थिक असल्याचे मानण्यात येते पण ही मोठी चूक आहे. हिंदुस्थानातील दलित समाजाची उन्नती करणे म्हणजे त्याच्या अन्न, वस्त्र, निवाऱ्याची सोय करून पूर्वीप्रमाणे त्यांना उच्च वर्णाची सेवा करावयास लावणे नव्हे. ज्याच्यामुळे खालच्या वर्गाची प्रगती खुंटून त्यांना दुसऱ्याचे गुलाम व्हावे लागेल. तो न्यूनगंड त्यांच्यातून नाहीसा करणे चालू समाजपद्धतीमुळे त्यांचे जीवन निर्दयपणे लुबाडण्यात आले आहे. त्याचे त्यांच्या स्वतःच्या व राष्ट्राच्या दृष्टीने काय महत्व आहे. याची त्यांना जाणीव करून देणे हाच खालच्या वर्गाचा प्रश्न आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसाराखेरीज दुसऱ्या कशानेही ते साध्य होणार नाही आणि माझ्या मते आमच्या सर्व सामाजिक दुखण्यावर हेच एक औषध आहे.''[3] यावरून शिक्षणाचे महत्व हे अद्भूत आहे हे लक्षात येते.

## निष्कर्ष :

या एकविसाव्या शतकात एकीकडे सारा देश कोरोना महामारीने वेढलेला आहे अनेक आव्हाने तरूण पिढीपुढे आलेले आहे. अशा परिस्थितीत मराठी आंबेडरवादी कविता जरी 1970 ते 1980 तर 1990 ते 2000 या कालखंडातील असली तरी आंबेडकरवाद हे आपल्या एकूणच जीवनाचे परिपूर्ण तत्वज्ञान आहे. यात भौतिकवाद, जडवाद, इहवाद, परिवर्तनवाद याची प्रचंड सामुग्री आहे, त्यामुळे मराठी आंबेडकरवादी कविता या अनुषंगाने ज्या कवयित्रीच्या कविता आपण या संशोधनातून मांडल्या आहेत त्या सामाजिक बांधिलकी, विद्रोह, नकार यांनी युक्त अशा परिवर्तनवादी कविता मीना गजभिये, सुरेखा भगत, संध्या रंगारी आणि प्रज्ञा बडोले यांच्या कवितेतून मांडल्या गेला आहे. मराठी कवयित्रीच्या कवितेपेक्षा मराठी आंबेडकरवादी कवयित्रीची कविता खऱ्या अर्थाने जीवनानुभवांनी साकारलेली, परिवर्तनांनी साकारलेली कविता असल्याने ती सर्वांच्या वेदनेला, नकारला, विद्रोहाला आपलीशी करून जाते. त्यामुळे

ती कविता पुरोगामी विचारधारेत बसतांना दिसते. असे या मराठी आंबेडकरवादी कवितेतून आपणास जाणिवपूर्वक बोध होतांना दिसते.

संदर्भ –

1) बागूल बाबूराव : दलित साहित्य सम्मेलन, नागपूर उद्घाटनाचे भाषण, 1976.
2) गंगाधर पानतावणे : साहित्य : प्रकृती आणि प्रवृत्ती, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, 1999, पृष्ठ 42.
3) आंबेडकर, भी. रा. : जनता, 22–09–1951.

संदर्भग्रंथ –

1) साबळे, सुरेश : 'युगांचे हुंदके' (समकालीन दलित कवयित्रींच्या कविता), संदेश प्रकाशन, बुलडाणा–443001, प्र.आ. जून 1998.
2) लिंबाळे, शरणकुमार : 'भारतीय दलित साहित्य', साहित्य अकादेमी, प्र.आ. 2013.
3) भवरे, महेंद्र : 'दलित कविता आणि प्रतिमा', लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई–4400025, प्र. आ. फेब्रुवारी, 2012.
4) खोब्रागडे, दीपक (संपा.) : 'आंबेडकरवादी साहित्य (डॉ. यशवंत मनोहर यांचे लेख), युगसाक्षी प्रकाशन, नागपूर–440022, प्र.आ. 14 ऑक्टोबर, 2005, दु.आ. 25 जुलै 2011.
5) फडके, भालचंद्र : 'दलित साहित्य वेदना व विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे–30, प्र.आ. डिसेंबर 1977, दु.आ. 1989, ति.आ. नोव्हेंबर 2000.
6) डहाके, आबाजी वसंत : कवितेविषयी, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद–431003, प्र.आ. जुलै 1999.
7) कवठेकर, बाळकृष्ण : 'दलित साहित्य : एक आकलन', मेहता पब्लिशिंग हाऊस, प्र.आ. जानेवारी, 1981, द्वि. आ. जुलै 1996.
8) रंगराव, बी. : 'मराठी दलित कविता', साहित्य अकादेमी, प्र.आ. 2004, दु.आ. 2007.
9) पाटील, भास्कर (संपादक) : मराठी कवितेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. विजयादशमी–ऑटो. 2008.
10) डोळस, अविनाश : 'आंबेडकरी विचार आणि साहित्य', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. 1994.
11) डांगळे, अर्जुन : दलित साहित्य : एक अभ्यास, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, 1978.
12) मनोहर, यशवंत : आंबेडकरवादी मराठी साहित्य, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्र.आ. 1999.